शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनेकहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम; नव्या कायद्यास मंजुरी

## जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्यास ७ वर्षांची कैद, पाच लाख दंडाची शिक्षा

**मुंबई -** जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्याला आता ७ वर्षांची कैद होणार आहे तसेच ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देखील होणार आहे. धर्मांतरविरोधी कायद्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' या नव्या कायद्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या कायद्याचे विधेयक विधानसभेत आणि विधान परिषदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे.

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ या नव्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या कायद्याचे विधेयक विधानसभेत आणि विधान परिषदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे. दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाल्यानंतर विधेयक राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पाठवले जाणार आहे. राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा राज्यात लागू होणार आहे.

राज्यात जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून केले जाणारे धर्मांतर रोखण्यासाठी हा कायदा

राज्यात जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून केले जाणारे धर्मांतर रोखण्यासाठी हा कायदा आणल्याचं सरकारची भुमिका आहे. यासंदर्भातील कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी व कायदेशीर बाबीचा अभ्यास करून कायद्याचा मसूदा तयार करण्यासाठी राज्य सरकारने विशेष समिति स्थापन केली होती. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली १४ फेब्रुवारी २०२५ रोजी समिती स्थापन करण्यात आली होती.

या कायद्यात कलम १४ मध्ये बेकायदेशीर धर्मांतरासाठी दोषी आढळलेल्या संस्थांवर बंदी व दंडाची तरतूद करण्यात आली आहे. कलम ९ मध्ये गुन्हे व त्यासाठीच्या शिक्षांची तरतूद आह. कलम ९ मधील उपकलम (४) मध्ये दोषींना सात वर्षांची कारावासाची शिक्षा व पाच लाख रुपयांचा दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे.

## जालना जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**जालना -** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जालना जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. या अफवेमुळे जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांनी इंधन भरण्यासाठी मोठी गर्दी केल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, जालना जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा पुरेसा असून इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे, असे स्पष्टीकरण जिल्हा प्रशासनाने दिले आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर नियमितपणे पुरवठा सुरू आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये. अतिरिक्त इंधन साठा करण्याची कोणतीही गरज नसून नागरिकांनी संयम पाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप कंपन्यांच्या विक्री अधिकारी आणि प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत आवश्यक सूचना प्रशासनामार्फत देण्यात आल्या आहेत. पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. इंधन तुटवड्याबाबत चुकीची माहिती किंवा अफवा पसरविणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी कोणत्याही अनाधिकृत माहितीवर विश्वास न ठेवता, अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा, असे जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी कळविले आहे.

## राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या प्रचार-प्रसिध्दी चित्ररथास प्रारंभ

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रसिध्दी मोहिमेची सुरुवात




**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२०२६ अंतर्गत विविध विभागाच्या कल्याणकारी योजनांची तसेच जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२०२६ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय जालना यांच्या वतीने आयोजित डिजिटल चित्ररथाला आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रचार-प्रसिद्धी मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. हे चित्रथ जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जाऊन प्रचार-प्रसिध्दी करणार असुन, यामुळे नागरिकांना तसेच लाभार्थ्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळणार असुन, या योजनांचा लाभ घेण्यास देखील मदत होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांदण रस्ते योजना, पीएम सुर्यघर मुफ्त बीजली योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, बालविवाह प्रतिबंध कायदा:२००६, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजनांचा समावेश आहे.

तसेच जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, अनुसूचित जातीतील लाभार्थींना शेळ्या/मेंढ्यांचे गट व दुभत्या जनावरांच्या गटाचा पुरवठा करणे, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, सौर उर्जा संयंत्र बसविणे, ग्रामीण भागातील महिलांना विविध साहित्य पुरविणे या योजनांचा समावेश आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना (नवीन विहिर व जुनी विहिर दुरुस्ती), अनुसूचित जातीतील लाभार्थींना शेळ्या मेंढ्यांचे गट व दुभत्या जनवरांच्या गटाचा पुरवठा करणे, रमाई आवास योजना (शहरी व ग्रामीण) आणि अनुसूचित जाती व नवबौध्द मुलां-मुलींकरीता तालुकास्तरावर १०० शासकीय निवासी शाळा या योजनांवर आधारित भित्तीपत्रिकांचे देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच या डिजिटल चित्ररथाद्वारे जिल्हा माहिती कार्यालय, जालना यांनी तयार केलेल्या बालविवाह मुक्त जालना, वन स्टॉप सखी सेंटर, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना आणि अनुसूचित जातीतील नागरिकांसाठी गटई स्टॉल योजना या योजनावर आधारित लघु माहितीपट देखील दाखवून प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ, लघु माहितीपट आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सूचित कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता स्मिता पवार, समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ निरिक्षक गणेश अंभोरे, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी, साक्षी उगले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानान इंगळे, संरक्षण अधिकारी श्री. कुलकर्णी, संतोष मुसळे, उपसंपादक (अ.का.) मिलींद तुपसमिंद्रे, श्रीमती पुष्पा धनाईत, प्रतिभा इंगळे, विष्णु जायभाये, संतोष पाखरे, महिला बाल विकास विभाग आणि सखी वन स्टॉप सेंटरचे कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे सण-उत्सव शांततेत संपन्न

## शिवजन्मोत्सव समितीकडून पोलीस अधीक्षक व पोलीस प्रशासनाचा सत्कार





**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि होळी-धुलीवंदन हे सण जालना शहरात अत्यंत शांततेत, उत्साहात आणि सर्वधर्मीय सलोखा कायम राखून यशस्वीरित्या पार पडले. या काळात शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने घेतलेल्या विशेष परिश्रमाची दखल घेत, मराठा क्रांती मोर्चा व शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल आणि पोलीस दलाचे व अभिनंदन करण्यात आले.

समितीचे संस्थापक अरविंद देशमुख, सन २०२६ चे शिवजन्मोत्सव अध्यक्ष विश्वंभर तिरुखे, निमंत्रक किशोर मरकड, अशोक पडूळ आणि धनंजय पोहेकर यांनी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, तसेच पोलीस निरीक्षक संदीप भारती यांची भेट घेऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. शहरातील संवेदनशील भागात चोख बंदोबस्त, रात्रीची गस्त आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोलिसांनी केलेले नियोजन कौतुकास्पद असल्याचे यावेळी नमूद करून पोलीस प्रशासनाचे व सर्व ठाण्यांच्या पोलीस निरीक्षकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी बोलताना शिव जन्मोत्सवचे अध्यक्ष विश्वंभर तिरुखे यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, जालना शहराची सामाजिक पान २ वर

## भास्कर दानवे यांनी साजरे केले अनाथ विद्यार्थ्यांसोबत धुलीवंदन



**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील दहिफळ तांडा येथील वसंतराव नाईक बालक आश्रम शाळेत भारतीय जनता पार्टीचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थितीत राहून धुलीवंदनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. आश्रमातील अनाथ विद्यार्थ्यांसोबत एकमेकांना रंग लावत आनंदाने धुलीवंदन साजरे करण्यात आले.

यावेळी भास्कर दानवे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या व आयुष्यात चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हा, त्यानंतर उपस्थित भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसोबत आणलेल्या टिफिन डब्बा पार्टीचा आनंद घेतला. या भेटीद्वारे भास्कर दानवे यांनी दहिफळ तांडा येथे भेट देत बंजारा समाजासोबत धुलीवंदनाचा सण उत्साहात साजरा केला.

यावेळी सिद्धिविनायक मुळे, तुकाराम चव्हाण, वसंतराव शिंदे, संजय डोंगरे, डॉ. तुकाराम कळकुंबे, परसराम तळेकर, विजय मोहिते, मुकेश चव्हाण, गोपाल चौधरी, युवराज राठोड, नारायण मोहिते, दौलत भुतेकर, भाऊसाहेब गोरे, बद्रीनाथ भसांडे, राजाराम जाधव, ज्ञानेश्वर राठोड, कृष्णा गायके, नागेश अंभोरे, बाबासाहेब राठोड, मच्छिंद्र चव्हाण, लक्ष्मण राठोड, तुकाराम राठोड, लाशिराम राठोड, अनिल राठोड, शेषराव राठोड, भीमराव राठोड, शिवाजी राठोड, प्रदीप राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिष्णू देव वर्मा यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती

**नवी दिल्ली -** तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची आता महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर तेलंगणाच्या राज्यपालपदी हिमाचल प्रदेशची जबाबदारी असलेल्या शिव प्रताप शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नावाची घोषणा केली. ईशान्य भारतातील अनुभवी राजकारणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिष्णू देव वर्मा यांनी त्रिपुरा राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

त्रिपुराच्या राजघराण्याशी संबंधित असलेले जिष्णू देव वर्मा हे भाजपचे ज्येष्ठ नेते मानले जातात. २०१८ ते २०२३ या कालावधीत त्यांनी त्रिपुराचे उपमुख्यमंत्री म्हणून काम करत राज्याच्या वित्त, ऊर्जा आणि ग्रामीण विकासासारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळली होती.

त्रिपुरातून राष्ट्रीय राजकारणापर्यंतचा प्रवास

जिष्णू देव वर्मा यांचा जन्म १५ ऑगस्ट १९५७ रोजी त्रिपुराची राजधानी अगरतळा येथे झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश पान २ वर

## इंग्लंडला पराभूत करत भारताचा अंतिम सामन्यात प्रवेश

**मुंबई -** भारतानं इंग्लंडला ७ धावांनी पराभूत करत टी २० वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. संजू सॅमसनची दमदार फलंदाजी, जसप्रीत बुमराहची गोलंदाजी आणि अक्षर पटेलच्या अफलातून क्षेत्ररक्षणामुळं भारतानं अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. इंग्लंडच्या बेथेलनं १०५ धावांची खेळी करत एकाकी झुंज दिली. भारताच्या विजयावर मोहम्मद कैफ आणि शोएब अख्तरनं प्रतिक्रिया दिली आहे.भारतानं प्रथम फलंदाजी करताना २५३ धावा केल्या होत्या. इंग्लंडनं या धावसंख्येचा पाठलाग करताना ७ विकेटवर २४६ धावा केल्या.

आजचा सामना दमदार झाला, मी असे सामने कमी पाहिले आहेत. आजच्या मॅचमध्ये ५०० धावा झाल्या. सर्वांनी चौकार षटकार मारले. शेवटच्या ओव्हरमध्ये कोण जिंकणार हे समजलं. टीम इंडिया प्रथम फलंदाजी करतेय हा चांगला निर्णय होता. भारत ७ धावांनी जिंकला आहे. जसप्रीत बुमराहनं ४ ओव्हरमध्ये ३३ धावा दिल्या एक विकेट घेतली. यामुळं भारतानं विजय मिळवला, असं कैफ म्हणाला.

संजू सॅमसनजी कामगिरी केली तिथून २०० धावा बनतात. तिलक वर्मा, इशान किशन, हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे यांनी केलेल्या कामगिरीमुळं भारत २५३ धावांपर्यंत मजल मारली. भारतानं सामना जिंकला हे पूर्ण संघाचं श्रेय आहे, असंही कैफ म्हणाला.रोहित शर्माकडे सहा गोलंदाज होते, यावेळी सूर्यकुमार यादवकडे ५ गोलंदाज आहेत. कर्णधार म्हणून सूर्यकुमार यादवचे निर्णय देखील महत्त्वाचे ठरले, असंही मोहम्मद कैफनं म्हटलं.

अक्षर पटेल चांगला क्षेत्ररक्षक असून त्यानं गोलंदाजी पान २ वर

## संपादकीय पान

# ... तर संपूर्ण जग होरपळून निघेल

इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला चढवून मध्यपूर्वेत युद्धाला तोंड फोडले. आपल्यावर हल्ला होईल याची कल्पना इराणला होतीच. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जूनमध्येच इराणला तशी धमकी दिली होती. तरीही इराणचे नेतृत्व याबाबतीत गाफील राहले. इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याची फुलप्रुफ योजना बनवली होती. या योजनेची इराणच्या गुप्तचर यंत्रणेला कुठलीही माहिती मिळाली नाही. हे इराणच्या गुप्तचर यंत्रणेचे अपयशच म्हणावे लागेल. त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी आणि त्यांचे अनेक विश्वासू लष्करी अधिकारी एकाच वेळी मारले गेले. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण आपल्याला सहज शरण येईल असे अमेरिकेला वाटले पण झाले उलटेच. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण पेटून उठला. अमेरिकेला शरण जाण्यापेक्षा त्यांनी स्वाभिमानाने त्यांच्याशी लढण्याचे ठरवले. इस्रायल आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवून त्यांनी इस्रायलच्या प्रमुख शहरांना लक्ष केले इतकेच नाही तर आखातात ज्या ज्या देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ले सुरू केले. त्यामुळे युद्धाची व्याप्ती वाढली. अमेरिका आणि इस्रायलनेही इराणच्या तेहरानसह प्रमुख शहरांना लक्ष करून क्षेपणास्त्रांचा मारा सुरू ठेवला तरीही इराणने माघार घेतली नाही. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण शरण येईल आणि आपला सहज विजय होईल अशा आविर्भावात असलेल्या इराण आणि इस्रायलला आठवडा होत आला तरी हे युद्ध थांबवता आले नाही उलट युद्धाची व्याप्ती वाढली. ती इतकी वाढली की खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांना हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालेल असे सांगावे लागेल. जर हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालले तर त्याची झळ केवळ या तीन देशांना किंवा आखातातील देशांनाच बसेल असे नाही तर संपूर्ण जगाला याची झळ बसेल . त्याची सुरुवातही झाली आहे. इराणने इंधन वाहू जहाजांसाठी हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. या सामुद्रधुनीतून फक्त चीनच्या जहाजांना जाण्यास परवानगी असल्याचे इराणने म्हटले आहे इतर देशांच्या जहाजांनी जर या सामुद्रधुनीत प्रवेश केला तर तर जहाजांवर हल्ला करेल अशी धमकी इराणने दिली आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी इंधन वाहतूक करणाऱ्या जहाजांसाठी खूप महत्वाची सामुद्रधुनी आहे. आखाती देशातून इतर देशांना होणारा तेलपुरवठा याच समुद्रधुनीतून होतो ते जर ही सामुद्रधुनी बंद झाली तर संपूर्ण जगात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होईल परिणामी संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळेल. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज दोन कोटी बॅरल इंधनाची वाहतूक केली जाते. तसेच कतार आणि यूएइ या अरब देशातून नैसर्गिक वायूची निर्यात देखील केली जाते. इराणच्या या कारवाईमुळे या सागरी क्षेत्रातून होणारी इंधनाची वाहतूक खंडित झाली असून जागतिक पुरवठा साखळी संकटात सापडली आहे. गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर ७२ डॉलर इतके होते आता ते ८१ डॉलर पर्यंत पोहचले सर जर हे युद्ध आणखी काही दिवस असेच सुरू राहिले तर आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर प्रति बॅरल २०० डॉलरवर पोहोचतील असे जाणकार सांगत आहेत. याचाच अर्थ हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ संपूर्ण जगाला बसू शकते. तेलाचे दर वाढले की महागाई वाढते हे असे अर्थशास्त्र सांगते त्यामुळे भविष्यात महागाईचा आगडोंब उसळू शकतो याचा फटका सर्वसामान्य जनतेलाच बसणार आहे. त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपणे हेच जगाच्या हिताचे आहे. हे युद्ध लवकर संपावे यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने प्रयत्न करायला हवेत. युद्ध थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप करायला हवा. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतीसेना पाठवून हे युद्ध रोखायला हवे. हे युद्ध जर वेळीच थांबले नाही तर कदाचित जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले जाईल आणि त्यात संपूर्ण जग होरपळून निघेल.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

## पान १ वरुन

### शिवजन्मोत्सव समिती ...

वीण घट्ट ठेवण्यात पोलीस प्रशासनाचा मोठा वाटा आहे. शिवजन्मोत्सव आणि होळीसारख्या मोठ्या सणांमध्ये पोलिसांनी अहोरात्र परिश्रम घेऊन सर्वसामान्यांना सुरक्षिततेची जाणीव करून दिली. सर्वधर्मीय बांधवांनी एकत्र येऊन सण साजरे करावेत, यासाठी प्रशासनाने केलेले नियोजन आदर्शवत असून, यामुळेच शहरात शांतता आणि सलोखा कायम राहिला आहे. या कर्तव्यदक्षतेबद्दल आम्ही संपूर्ण पोलीस दलाचे ऋणी आहोत.

### इंग्लंडला पराभूत ...

केली आहे. भारत फलंदाजीला येतो तेव्हा जगातील सर्वात बेस्ट टीम आहे. भारतानं क्षेत्ररक्षणात कमी चुका केल्या. इंग्लंडनं जास्त चुका क्षेत्ररक्षणात केल्या ते घाबरले होते. जर सॅम करननं १५ बॉल खेळले नसते तर मॅच फसली असती. बुमराह जेव्हा धावा वाचवण्यासाठी येतो तेव्हा ते अफलातून कामगिरी करतात. बुमराहनं यॉर्करचा मारा केला आणि धावा वाचवल्या, असं शोएब अख्तरनं म्हटलं.

### जिष्णू देव वर्मा ...

केला. १९९० च्या दशकात त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करून सक्रिय राजकारण सुरू केले. त्रिपुरामध्ये डाव्या पक्षांचे वर्चस्व असतानाही भाजपची संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले. १९९६, १९९८ आणि १९९९ मध्ये त्यांनी त्रिपुरा ईस्ट लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली.२०१८ मध्ये त्रिपुरात भाजप सत्तेत आल्यानंतर जिष्णू देव वर्मा यांना उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली. त्या काळात त्यांनी वित्त, ऊर्जा, नियोजन, पंचायत राज आणि ग्रामीण विकास यांसारख्या विभागांचे नेतृत्व केले.

# महिला आज आपल्या देशात सुरक्षित आहेत का ?

जागतिक महिला दिनाच्या सर्व माता - भगीणींना खूप खूप हार्दिक शुभेच्छा. बऱ्याच वेळा म्हटले जाते कि '' व्यवहार हा घरातील शुभ कलश आहे, इन्सानियत घरातील तिजोरी आहे, मधुर वाणी घरातील धन - दौलत आहे, शांती घरातील महालक्ष्मी आहे, पैसा हा घरातील क्षणिक पाहुणा आहे, एकता घरातील ममता आहे, व्यवस्था घरातील शोभा आहे आणि समाधान हे घरातील खरे सुख आहे.'' ह्या प्रमाणे सर्व गुण घरातील स्त्रीयांकडे असतातच असतात त्यांच्यामुळेच आपण सुखी व समाधानी आहोत. '' स्त्री ही वकील, डॉक्टर किंवा इंजिनिअर नाही झाली तरी चालेल, परंतु ती गृहकृत्यदक्ष सहचारिणी, माता आणि भगिनी व्हायलाच पाहिजे '' असी थोरामोठ्यांची इच्छा असते.

'' महिलांना चार वेदांचे अर्थ नाही समजले तरी चालतील पण समजदारी, जबाबदारी, वफादारी आणि इमानदारी '' या चार शब्दांचे मर्म समजले तरी त्यांचे जीवन सार्थकी लागेल. म्हणून नवोदितानी व तरुणांनी अश्या गृहलक्ष्मीचा स्विकार करायला हवा. परंतु आता ती परस्थिती बदललेली आहे. आताच्या तरुणांची पसंती आपली सहधर्मचारिणी ही डॉक्टर, वकील, उच्चंशिक्षित किंवा इंजिनीअरच झालेली असावी. असे तरुणाईची मागणी आहे. आपला भारत देश हा पुरुष प्रधान देश असला तरी स्रियाचा आदर करणारा देश आहे. आज जगातील महिला ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व जबाबदाऱ्या स्विकारणारी एक अद्भुत शक्ती आहे. असे म्हटले तर अतिशोक्ती होणार नाही. कारण उच्चंशिक्षण ही काळाची गरज आहे. '' महिला ही अशी शक्ती, ताकद आणि स्पुर्ती आहे कि ती कोणत्याही व्यक्तीला सांभाळून घेणारी माता आणि भगिनी आहे. '' कारण कुटुंबाची नेहमीच जास्त काळजी घेणारी व्यक्ती म्हणजेच प्रत्येक घरातील स्त्री होय. जेव्हा आपल्या घरातील स्त्री आजारी पडते तेव्हा तिचे पहिले टेन्शन तिचे स्वतःचे आजारपण नसते, तर तिला टेन्शन फक्त तिच्या कुटुंबियांच्या जेवणाचे असते. अशी काळजी करणारी स्त्री घरात नसेल तर संपूर्ण कुटुंबाची वाताहात होते. कारण ती आपल्या चिंताग्रस्त पतीला व मुलाला कोणत्याही प्रसंगाच्या वेळी नेहमी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभीराहून सांगते मी आहेना तू किंवा तुम्ही घाबरू नका. '' काळजी घे हा शब्द काळजातून निघतो, आपल्या - परक्याची जान करून देतो, कोणीतरी आहे आपल्यासाठी झुंजणारे, रडणारे या भावनांनीच घरातील कर्त्या पुरुषाचा जीव सुखवतो, काळजी घे या शब्दातच आपलेपणा दरवळतो. '' आणि हे शब्द असतात ते घरातील स्त्रीचे म्हणजेच आईचे किंवा बहिणीचे. या शब्दात एवढी ताकद असते कि कमजोर व्यक्तीला कोणतेही आव्हान पेलण्यासाठी एक प्रकारची ऊर्जा आणि स्पुर्ती देणारी देवता म्हणजेच कुटुंबातील माता किंवा भगिनी असते. वरील वाक्य नेहमीच सर्वांच्या घरात ऐकायला मिळते. त्यामुळेच घरातील कर्ती व्यक्ती सफलतेकडे सुखकर प्रवास करते. कारण स्त्री ही लहान मुलांना घडवणारी एक अद्भुत शक्ती असते.

आजच्या डिजिटल आणि संगणकीय युगात महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. याची जाणीव ठेऊन केंद्र सरकारने गेल्याच वर्षी महिलांना आरक्षण देणारे विधेयक मंजूर करून तमाम स्रियाना बहुमान दिलेला आहे. या आरक्षणा बरोबर स्रियाना समाजात सन्माननीय वागणूक मिळाली तरी पुरेसे आहे. '' नम्रता हा गुण सर्व गुणांपेक्षा जास्त किमती व मौल्यवान आहे, तो ज्याच्याकडे आहे त्याच्या भोवती कितीही बलाढ्य स्पर्धक असले तरी तो आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो. '' असे गुण फक्त घरातील स्त्रीकडे असतात. म्हणून स्रियाकडे आदराने बघा, त्यांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष दिला पाहिजे.

आपल्या भारत देशात आजही प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात व गावांत रोज अत्याचार होत असलेल्या बातम्या आपण रोज ऐकतो आहोत. वर्तमान पत्र उघडले किंवा दूरदर्शन वर बातम्या लावल्या तर दररोज कुठेना कुठे तरी महिलांवर किंवा लहान मुलीवर अत्याचार झाल्याचे वाचतो किंवा बघतो त्यात कुठे शिक्षक, पोलीस, म्हातारी व्यक्ती, सावंत्रा बाप, मित्र, प्रियकर, काका किंवा मामा यांच्या कडून मुलींवर किंवा स्रियावर अत्याचार झाल्याच्या बातम्या ऐकतो. हे सर्व कमी होण्यासाठी देशात तसें कडक कायद्यांची अंमलबजावणी होते आहेच. तरीही त्यांच्यावरील अत्याचार थांबलेले नाहीत असे का? सरकारने आरक्षणा बरोबर त्यांना सुरक्षितता द्यायला हवी. तरच आजची स्त्री ताठ मानेने कुठेही आणि कधीही फिरू शकेल. आज घरातील स्त्री - मुलगी बाहेर गेली तर ती घरात परत येई पर्यंत घरातील व्यक्तींच्या जीवातजीव नसतो. कारण ती घरी सुखरूप परत येईलचा याची शास्वती नाही. या जागतिक महिला दीना निमित्ताने प्रत्येक भारतीयांचेच नव्हे तर प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे ते म्हणजे स्त्रीयांचे संरक्षण करण्याचे. बेटी - बचाव, बेटी पढाव! या बरोबरच प्रत्येकाने स्त्रीयांच्या कर्तृत्वाला दादा देऊन आपण सर्वांनी स्त्रीयांचा आदर केला तरच जागतिक महिला दिन साजरा केल्याचा आनंद व्यक्त करून तो उत्साहत साजरा झाल्याचे समाधान मिळेल. '' स्रियांना आरक्षण देऊन देवी बनवून बंदिस्त करण्यापेक्षा तिच्या पंखाना बळ देऊन तिला मुक्त विहार करता येईल असे कायदे बनवा. '' हीच जागतिक महिला दिनाची त्यांना भेट द्या म्हणजे त्यांना बिनधास्त, स्वैर आणि स्वछंदी जीवन जगता येईल. नाहीतर आपल्या देशातील महिला सुरक्षित आहेत काय? याचे उत्तर कधीच मिळणार नाही.

**दत्ताराम दळवी,**
**लालबाग ९८२०५२७८५५**

# कला-साहित्य भूषण: यशस्वितांची वास्तव ओळख!

देवेंद्र भुजबळ , निवृत्त माहिती संचालक महाराष्ट्र शासन यांनी लिहिलेले कला-साहित्य भूषण हे पुस्तक वाचण्याचे भाग्य लाभले. प्रतिकूल परिस्थितीतही कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन याप्रमाणे सतत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा, त्यांच्या कार्याचा सर्वदूर परिचय व्हावा या सकारात्मक वृत्तीने तीस व्यक्तिंचा परिचय करून देण्याचे अविस्मरणीय काम श्री भुजबळ यांनी कला -साहित्य भूषण पुस्तकाच्या माध्यमातून केले समाजासमोर आहे. देवेंद्र भुजबळ यांना हा एक ध्यास जडला आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये. कारण त्यांनी लिहिलेली भावलेली व्यक्तिमत्त्वे, गगनभरारी, प्रेरणेचे प्रवासी, अभिमानाची लेणी, समाजभूषण, आम्ही अधिकारी झालो, माध्यमभूषण ही पुस्तके त्यांच्या लेखनाची साक्ष देतात.

मनोगत लिहिताना एक प्रश्न भुजबळ सरांनी स्वतः लाच विचारला आहे, मी का लिहितो, माझ्या लेखनाचा वाचकांना, समाजाला काय उपयोग आहे, मुळात काही उपयोग आहे का? लेखक या प्रश्नांची स्वतःच उत्तर देताना म्हणतात,प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ज्यांनी यश मिळविले, आणि स्वतःला मिळालेल्या यशावर समाधान न मानता, ज्या व्यक्ती इतरांना यशस्वी करण्यासाठी झटत आहेत, त्यांच्या यश कथा, जीवनकथा आपल्या लेखणीद्वारे समाजासमोर आणणे होय. किती प्रामाणिक आणि सच्चा संदेश आहे हा!

भुजबळ सरांना हा ध्यास असण्यामागे दुसरीही एक इच्छा नक्कीच असणार, कारण आपण बघतो की,

समाजात, हल्ली छोट्याछोट्या कारणांमुळे, थोड्याशा अपयशामुळे खचून जाणे, नैराश्य येणे ह्या गोष्टी वाढत चालल्या आहे. त्यामुळे

अशा प्रेरणादायी जीवन कथांमुळे अनेक निराश व्यक्तिंना ऊर्जा मिळू शकते, आत्मविश्वास परत येऊन ते इप्सित साध्य करण्यासाठी नव्या जोमाने प्रयत्न करू शकतात.

गझलम्राट सुरेश भट यांनी लावलेल्या गझलेच्या बीजाचे वटवृक्षात रुपांतर करण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा असलेले अमरावतीचे ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे यांच्या एकूण प्रवासाला भुजबळ यांनी शब्दसाजांनी फुलवले आहे. सुरेश भट यांनी पांचाळे यांना गज़लनवाज देऊन सन्मानित केले आहे. गत् पन्नासहून अधिक वर्षे गझलेच्या प्रांगणात मुशाफिरी करणाऱ्या भीमराव यांच्यासाठी हा फार मोठा पुरस्कार आहे. महाराष्ट्रासह देशविदेशातील रसिकांना पांचाळे यांनी मंत्रमुग्ध केले आहे.


जयंत ओक यांचा प्रवास त्यांच्या धाडसाचे कौतुक करावे असाच आहे. दूरदर्शनवर काम करणे म्हणजे अभिमानास्पद! परंतु ओक यांनी सतरा वर्षे नोकरी

करून ती सोडून गप्पागोष्टी हा स्वतंत्र एकपात्री प्रयोग सुरू केला. अल्पावधीत त्यांच्या धाडसाने यशश्री खेचून आणली. हा प्रयोग भारतासोबत अनेक देशांमध्ये प्रचंड यशस्वी झाला. म्हणतात ना, कोशिश करनेवाले की हार नहीं होती हे ओक यांनी सिद्ध करून दाखवले अर्थात त्यांनी किती कष्ट घेतले हे त्यांनाच माहीत!

खबरदार जर टाच मारुनी, जाल पुढे चिंधड्या उडवीन, राई राई एवढ्या... ह्या वीररसाच्या, स्फूर्तिदायी अशा ओळी आहेत. हे गीत न ऐकलेला माणूस शोधूनही सापडणार नाही. हे गीत ऐकताना अंगावर रोमांच उभे राहतात. परंतु काही व्यक्ती अशा असतात ज्या रुळलेल्या वाटेवरून न जाता स्वतःची वेगळी वाट निर्माण करतात. असाच एक छंदिष्ट कलावंत म्हणजे प्रा. विसुभाऊ बापट! या वीररसयुक्त गीताला एका शाळेत शृंगार रसाकडे वळविल्याचे पाहून बापट यांनी ही कविता योग्य आणि मूळ रसात पोहोचावी म्हणून ओंकार काव्य दर्शन शीर्षाखाली शालेय कार्यक्रम सुरू केला. गौरवास्पद बाब म्हणजे या कार्यक्रमाचे साडेबारा हजार कार्यक्रम सादर झाले आहेत हे लेखक आपुलकीने लिहितात. सोबतच विसुभाऊंचा कुटुंब रंगलंय काव्यात हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रमही लोकप्रियतेच्या शिखरावर आहे.

आपल्या समाजात, घरात चित्रपट पाहणारा माणूस म्हणजे वाया गेलेला माणूस समजला जातो. वृत्तपत्रात चित्रपट समीक्षण लिहिणाऱ्यासही कमी लेखले जाते... असे विधान करणारे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समीक्षक, लेखक, भारतासह इतर देशात चित्रपट महोत्सवात ज्युरी म्हणून ओळखले जाणाऱ्या अशोक राणे यांनी समाजाला चित्रपट पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली. राणे यांची साहित्य क्षेत्रातही फार मोठी कामगिरी आहे. त्यांच्या जीवनातील अनेकानेक प्रसंगांचे वर्णन देवेंद्रजी यांनी छान रेखाटले आहे.

आकाश, निसर्ग, क्षितिज या गोष्टी मानवाच्या औत्सुक्याचा आहेत. दूरदर्शनच्या निर्मात्या मीना गोखले यांनी एक सुंदर संदेश दिला आहे, आकाश




खूप मोठं आहे. तुम्ही भरारी घ्याल तितकी त्याची निळाई खोल आहे. मीना गोखले यांच्या कार्याची ओळख, महत्त्व भुजबळ सरांनी मोठ्या आत्मियतेने व्यक्त केले आहे. मीनाताईंचा दुसरा एक स्वानुभवयुक्त संदेश आहे,

निर्मिती करताना ही जी मी आहे तिचा काय फायदा झाला? तर माझा मी पणा कमी झाला...

केवळ नाव प्रतिभा आहे असे नाही तर लेखनही प्रतिभासंपन्न असणाऱ्या लेखिका म्हणजे प्रतिभा सराफ! भौतिकशास्त्राचे अध्यापन करताना तेरा पुस्तके प्रकाशित करणे ही सोपी गोष्ट नाही. पती

अर्ध्यावर संसार सोडून गेल्यावर त्यांनी पुस्तकाची मैत्री केली. पतीच्या आठवणी जागृत करताना त्यांनी कथा, गझल, कादंबरी असे साहित्य प्रसवले. साहित्य त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग असे बनले ते त्यांच्या शब्दांत...

लिहित नाही तेव्हा तेव्हा वाचत असते. वाचत नाही तेव्हा तेव्हा लिहीत असते. दुःख अवतीभोवती असणाऱ्यांचा वरील ओळी आत्मविश्वास जागविणाऱ्या ठरतात.

गायिका, प्राध्यापिका, लेखिका, चित्रपट संगीत शोधक सोबत राजा हरिश्चंद्र अशा चित्रपटांसाठी योगदान देणाऱ्या हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. मृदुला दाढे! त्यांचा जीवनप्रवास लेखक भुजबळ यांनी सहजतेने उलगडला आहे.

लावणी न ऐकलेला मराठी माणूस विरळाच! लावणी हे तमाशातील लोकप्रिय असे अंग! भुजबळ सरांनी ह्या लोकप्रिय क्षेत्रातील रेश्मा मुसळे परितेकर या उच्चशिक्षित लावणी कलाकाराची छान माहिती समोर ठेवली आहे. विशेष म्हणजे रेश्माताई हा व्यवसाय सांभाळताना मराठी लावणी या विषयावर पी.एचडी. करीत आहेत ही कौतुकास्पद बाब आहे. त्यांनी प्रस्तुत केलेले बोल सद्य परिस्थितीत महत्त्वाचे आहे,

सध्या लावणीला जे चित्रपट, रिॲलिटी शोज चे वळण प्राप्त झाले आहे, त्यामुळे खरी लावणी लोप पावत चालली असून लावणी जिवंत ठेवण्यासाठी आपली वैचारिकता वाढविण्याची आवश्यकता आहे.

सिंगापूर येथे वास्तव्यास असलेल्या मोहना कारखानीस यांनी तिथे मराठी साहित्याची सेवा सुरू ठेवली आहे. त्यांचे साहित्य सिंगापूर येथील महाराष्ट्र मंडळ प्रकाशित करीत असलेल्या ऋतुगंध या द्विमासिकासोबत अनेक डिजिटल पोर्टल, दिवाळी अंक, विशेषांक, वर्तमानपत्र पुरवणी इत्यादी ठिकाणी सातत्याने प्रकाशित होत असते. सोबतच परदेशात राहणाऱ्या मुलांना मराठी संस्कृतीचे शिक्षण, मराठीची गोडी लावण्यासाठी कार्यरत आहेत. आपल्या देशातील जातपात, उच्चनीच, गरीब श्रीमंत इत्यादी भेद लवकर नष्ट व्हावेत हा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे. चांगले ते स्वीकारावे, वाईट ते सोडून द्यावे आणि सतत कार्यमग्न रहावे. ही त्यांची विचारसरणी अनुकरणीय आहे.

शाहीर वैराळकर, गायिका विजयालक्ष्मी मणेरीकर, परदेशस्थ चित्रकार शिल्पा तगलपल्लेवार, गझल गायक सुरेश दंडे, चित्रकार माधवी पाटील, चित्रकार विजयराज बोधनकर, लेखक डॉ.आलोक जत्राटकर, नाट्यकर्मी डॉ. श्याम शिंदे, लेखिका उषा रामवाणी, चित्रकार प्रतिभा रावळ, साहित्यिक-संशोधक धर्मपाल कांबळे, कलाकार कुटुंब रझाक-वृशाली आणि रायमा, चित्रकार रमेश औंधकर, दूरदर्शन निर्माते रविराज गंधे या मान्यवरांचा प्रवासही लेखक देवेंद्र भुजबळ यांनी अत्यंत आपलेपणाने नि शब्दसाजांनी साकारला आहे.

अमेरिकेत वास्तव्य असणाऱ्या कवयित्री डॉ. गौरी जोशी कंसारा यांचा कवितेचे रसग्रहण हा आवडता साहित्य प्रकार! कवी बा.भ. बोरकरांच्या काव्याबद्दल त्या लिहितात,बोरकर यांची लावण्य रेखा ही कविता कर्मयोगाचे श्रीकृष्णाने सांगितलेले तत्त्वज्ञान अतिशय सौंदर्यपूर्ण शब्दांत समजावणारी अशी मला वाटते.

जगप्रसिद्ध चार्ली चॅप्लिन या कलाकाराची भारतीय प्रतिकृती म्हणजे वरप्रभ शिरगावकर! चॅप्लिनसारखी हुबेहुब वेशभूषा, केशभूषा करून महाराष्ट्रभर मनोरंजनातून प्रबोधन करणाऱ्या शिरगावकर यांच्या कार्याची योग्य शब्दांमध्ये लेखकाने दखल घेतली आहे.

भारूड ह्या लोककलेचा प्रसार नि प्रचार करणारा लोकप्रिय कलाकार म्हणजे हमीद सय्यद! कविता, देशभक्तीपर गाणी, अभंग, गौळणी, लोकगीते, कथा, कीर्तने ऐकण्याची आवड सय्यद यांना लहानपणापासूनच होती. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमात आपली कला सादर केली. नंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये त्यांनी कला सादर केली आहे.

काही नावे हीच त्या व्यक्तिची ओळख असते. अन्य विशेषणे, कौतुक याची फारशी आवश्यकता नसते. सुप्रभात, आरसा, हसवाहसवी, हास्यपंचमी, हास्यरंग, खळखळाट, विडंबन गीते, इत्यादी कार्यक्रमांसोबत विनोद, किस्से, विडंबने सादर करून घराघरात पोहोचलेली व्यक्ती म्हणजे बंडा जोशी! अशा चौफेर व्यक्तिमत्त्वाची ओळख भुजबळ सरांनी अत्यंत आत्मीयतेने करून दिली आहे.

चित्रेकलेच्या प्रांतात वारली हा प्रकार स्वतःचे आगळेवेगळे स्थान टिकवून आहे.या क्षेत्रातील एक सुप्रसिद्ध नाव म्हणजे मधूकर वाडू! ह्या वैशिष्ट्य प्रकारासोबत वाडू लेखन क्षेत्रातही अग्रेसर आहेत. वारली प्रकारातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन देवेंद्रजी यांनी त्यांचा योग्य सन्मान केला आहे.

जाता-जाता अस्मादिकाच्या कार्याचा उत्तम आढावा भुजबळ सरांनी घेतल्यामुळे आगामी कार्यासाठी प्रेरणा मिळाली आहे. कला-साहित्य भूषण ह्या पुस्तकातील सर्वच मान्यवरांचा प्रवास भुषणावह, अलौकिक, वाचनीय नि अनुकरणीय, प्रेरणादायी आहे.

**कला-साहित्य भूषण : व्यक्तिचित्रण**
**लेखक : देवेंद्र भुजबळ ९८६९४८४८००**
**प्रकाशिका:सौ.अलका भुजबळ,न्यूज स्टोरी प्रकाशन नवी मुंबई .**
**आस्वाद: नागेश शेवाळकर, पुणे ९४२३१३९०७१**





नाथ षष्ठी निमित्त पैठणला रखरखत्या उन्हात देवाचे नाव स्मरण करत भक्तगण नाथाचे दर्शन घेण्यास पैठणला रवाना होत आहे छायाचित्र किरण खानापुरे

# दोषांचा त्याग केल्यास माणूस देव होतो - ह.भ.प. डॉ. भगवान महाराज आनंदगडकर

## संतसंवाद स्मरणिकेचे आनंदगड येथे थाटात प्रकाशन; जेइएस महाविद्यालयाचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** मानवातील षड्रिपू आणि दोषांचे पूर्णतः निर्मूलन झाले, की त्याला खऱ्या अर्थाने देवपण प्राप्त होते. आजच्या धकाधकीच्या काळात जगाला संतांच्या चिरंतन विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. डॉ. भगवान महाराज आनंदगडकर यांनी केले. आनंदगड येथे आज आयोजित संतसंवाद स्मरणिका प्रकाशन आणि सत्कार सोहळ्यात मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

डिसेंबर महिन्यात संपन्न झालेल्या वारकरी संत साहित्य संमेलनाच्या स्मृतींना उजाळा देणारी आणि संतांचे तत्त्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवणारी संतसंवाद ही विशेष स्मरणिका आज मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जेइएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते, तर व्यासपीठावर ह.भ.प. सोनुने गुरुजी, डॉ. सुजाता देवरे आणि संपादक डॉ. यशवंत सोनुने यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुढे बोलताना डॉ. आनंदगडकर महाराज म्हणाले की, माणसाने स्वतःमधील दोषांचा त्याग केला तरच त्याचे जीवन सार्थकी लागते. संतांचे विचार हे केवळ वाचनापुरते मर्यादित नसून ते आचरणात आणणे ही काळाची गरज आहे. संतसंवाद या स्मरणिकेच्या माध्यमातून हे प्रेरणादायी विचार वाचकांना नक्कीच नवी दिशा देतील.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी नमूद केले की, ''संतांच्या संगतीतच माणूस खऱ्या अर्थाने घडतो. जालनेकरांसाठी हे संत साहित्य संमेलन केवळ एक कार्यक्रम नसून तो एक ऐतिहासिक ठेवा होता. त्यातील ज्ञानाचा सुगंध या स्मरणिकेच्या रूपाने आता घरोघरी पोहोचणार आहे.''

याप्रसंगी ह.भ.प. सोनुने गुरुजी यांनी स्मरणिकेच्या अंतरंगाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की, ''या स्मरणिकेत संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत तुकाराम आणि वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानावर भाष्य करणारे तज्ज्ञांचे अभ्यासपूर्ण लेख आहेत. हा अंक अभ्यासक आणि सामान्य वाचक अशा दोघांसाठीही मार्गदर्शक ठरेल.''

वारकऱ्यांची मोठी उपस्थिती

या दिमाखदार सोहळ्याला कुंभारझरी, जाफरबाद , भोकरदन, जालना परिसर, बुलढाणा चिखली आणि खामगाव येथून वारकरी भाविक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. एकनाथ शिंदे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. वासुदेव उगले यांनी मानले.

# प्लॉस्टीकमुक्त कॅम्पस करण्याची शपथ व प्लॉस्टीकची होळी




**परभणी । प्रतिनिधी -** कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविघालय परभणी येथील विद्यार्थीनी व सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी होळी निमित्ताने प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे यांच्या मार्गदर्शना खाली आज महाविद्यालय परिसर स्वच्छता करून, प्लॉस्टीक कचरा एकत्रीत करून त्यांची होळी केली. महाविघालय प्लॉस्टिक मुक्त ठेवण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमात महाविघालयातील विद्यार्थीनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. या बरोबरच सर्व प्राध्यापक ही या स्वच्छता मोहीमेत श्रमदानं करून सहभागी झाले. विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक सर्वानीच सहभाग घेऊन ही स्वच्छता मोहीम राबवली.






उन्हाळ्याची चाहूल लागतात गरिबांचा फ्रिज म्हणून ओळखल्या जाणारा माठ बाजारात विविध प्रकारामध्ये उपलब्ध झालेले आहेत. (छायाचित्र जावेद तांबोली)

# श्रीनिवास तोतला याचे सीए अंतिम परीक्षेत देदीप्यमान यश

**जालना । प्रतिनिधी -** श्रीनिवास नितीन तोतला याने इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. अवघ्या २३ व्या वर्षी त्याने मिळवलेले हे यश जालना शहराच्या शैक्षणिक वैभवात भर घालणारे ठरले आहे.



श्रीनिवास हा जालन्यातील नामांकित सीए ॲड. नितीन तोतला आणि ॲड. अर्चना तोतला यांचा सुपुत्र आहे. आई-वडिलांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांनी घालून दिलेल्या शिस्तीच्या बळावर श्रीनिवासने हे यश प्राप्त केले आहे. श्रीनिवासने केवळ सीए परीक्षेतच नव्हे, तर यापूर्वी जागतिक पातळीवरील कठीण मानली जाणारी फायनान्शिअल रिस्क मॅनेजर (एफआरएम) ही परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. ग्लोबल असोसिएशन ऑफ रिस्क प्रोफेशनल्सतर्फे घेण्यात येणारी ही परीक्षा उत्तीर्ण होणारा तो जालन्यातील पहिला विद्यार्थी ठरला होता. आता सीए फायनलमध्ये यश मिळवून त्याने आपल्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केले आहे. श्रीनिवासचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, त्याने पुण्यातील नामवंत सिम्बायोसिस कॉलेजमधून बी.कॉम. पदवी पूर्ण केली. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्याने व्यावसायिक अभ्यासक्रमात आपले लक्ष केंद्रित केले होते. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्याने एकापाठोपाठ एक ही दोन मोठी शिखरे सर केली आहेत. श्रीनिवासच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# अनुकंपा नियुक्तीत प्रशासकीय दिरंगाई

## आकाश चव्हाण यांचे आमरण उपोषण




**मंठा । प्रतिनिधी -** दिवंगत ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या मुलास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात प्रशासनाकडून सुरू असलेल्या दिरंगाईच्या निषेधार्थ आकाश विष्णू चव्हाण यांनी गुरुवारपासून (दि. ५ मार्च २०२६) ग्रामपंचायत कार्यालय वांजोळा येथे आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.माहितीनुसार, आकाश चव्हाण यांचे वडील कै. विष्णू नारायण चव्हाण हे ग्रामपंचायत वांजोळा येथे पाणीपुरवठा शिपाई म्हणून कार्यरत असताना त्यांचे दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या पश्चात कुटुंबाचा निर्वाह करण्यासाठी आकाश चव्हाण यांनी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज सादर केला होता.याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांनी दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी पत्र क्रमांक २४४९ द्वारे संबंधित ग्रामपंचायतीस नियुक्तीसाठी स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, स्थानिक ग्रामसेवक व प्रशासक यांनी अद्याप त्या आदेशाची अंमलबजावणी न करता जानबूज करून विलंब केल्याचा आरोप आकाश चव्हाण यांनी केला आहे.चव्हाण यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, ''गेल्या अनेक महिन्यांपासून माझ्याकडून पाणीपुरवठ्याचे काम करून घेतले जात आहे, पण आत्तापर्यंत मला कोणतेही मानधन देण्यात आलेले नाही. वारंवार ग्रामसभेमध्ये प्रस्ताव घेतले जात असूनही नेमकी कारवाई होत नाही. त्यामुळे माझा आर्थिक व मानसिक छळ होत आहे.''त्यांनी पुढे नमूद केले की, ''अनुकंपा नियुक्ती हा माझा कायदेशीर हक्क असूनही, ग्रामपंचायत आणि प्रशासकीय अधिकारी जाणूनबुजून विलंब करून कुटुंबावर अन्याय करत आहेत. प्रशासनाकडून न्याय न मिळाल्यास माझ्या आरोग्याला किंवा जीवितास काही अपाय झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायत व संबंधित अधिकारी यांच्यावर राहील.''आकाश चव्हाण यांच्या आमरण उपोषणामुळे ग्रामपंचायत परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी न्याय मिळावा, अशी मागणी करत प्रशासनाकडून तत्काळ हस्तक्षेप करण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# रोटरीच्या मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराने १३६ जणांच्या चेहऱ्यावर फुलविले हास्य!

## जर्मन डॉक्टरांची टीम पाहुणे नव्हे, तर जालना जिल्ह्याच्या कुटुंबाचा अविभाज्य भाग-आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या २१ वर्षांपासून जालना शहरात सेवेचा वारसा जपणा-या रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे आयोजित २१ व्या मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचा समारोप आणि जर्मन डॉक्टरांचा गौरव सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला. २१ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२६ या कालावधीत जालना मिशन हॉस्पिटलमध्ये पार पडलेल्या या शिबिरात जर्मनीहून आलेल्या तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने १३६ रुग्णांच्या आयुष्यात नवसंजीवनी फुंकली आहे. या मानवतावादी सेवेबद्दल जिल्हा प्रशासनाच्यावतीने हॉटेल मधुबन येथे एका विशेष सोहळ्यात जर्मन डॉक्टरांचा गौरव करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ जालना, रोटरी क्लब बॉम्बे मिडटाऊन आणि जर्मन रोटरी डॉक्टर वॉलेंटियर ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर चक्क काश्मीरमधील लेह-लडाख आणि कोलकता येथील रुग्णांनीही जालन्यात येऊन या मोफत शस्त्रक्रियांचा लाभ घेतला. जन्मजात फाटलेले ओठ, टाळू, आगीत भाजल्यामुळे आलेले व्यंग आणि इतर प्लास्टिक सर्जरीच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया जर्मन डॉक्टरांनी विनामूल्य पार पाडल्या.

हॉटेल मधुमनमध्ये जर्मन डॉक्टरांच्या पथकाला निरोप देण्यात आला. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. त्या म्हणाल्या, जर्मनीहून हजारो किलोमीटरचा प्रवास करून जालन्यातील गोरगरीब रुग्णांच्या सेवेसाठी येणारे हे डॉक्टर्स आता आमच्यासाठी पाहुणे राहिले नसून, ते जालना जिल्ह्याच्या कुटुंबाचा एक अविभाज्य भाग बनले आहेत. त्यांच्या या सेवाभावामुळे अनेक चेहऱ्यांवर हास्य फुलले आहे. पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या शिबिरात जिल्हा प्रशासन स्वतःहून अधिक लक्ष घालून सर्वतोपरी सहकार्य करेल.

रोटरी क्लबच्या अध्यक्षा




सौ. वर्षा पित्ती म्हणाल्या, गेल्या दोन दशकांहून अधिक काळ रोटरीने हा सेवेचा यज्ञ सुरू ठेवला आहे. जर्मन डॉक्टरांची टीम आणि मिशन हॉस्पिटलच्या सहकार्यामुळेच आज लडाखसारख्या दुर्गम भागातूनही रुग्ण विश्वासाने येथे येतात. ही रुग्णसेवाच आमच्यासाठी खरी ईश्वरसेवा आहे.

या गौरव सोहळ्यास जिल्हाधिकारी कार्यालयातील सुप्रवीन पाखरे, कु. साक्षी उगले, मिशन हॉस्पिटलचे डॉ. सी. डी. मोझेस, रोटरीचे सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख रो. अभय नानावटी, ज्येष्ठ सदस्य रो. सुरेश अग्रवाल, रो. हेमंत ठक्कर, रो. अरुण अग्रवाल, रो. सुरेश मगरे, रो. रमेश मगरे, रो. दीपक बगडिया, रो. सरला अग्रवाल, रो. अर्चना देशपांडे यांच्यासह रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालन रो. किशोर देशपांडे आणि रो. प्रशांत महाजन यांनी केले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने प्रथमच अशाप्रकारे जर्मन डॉक्टरांचा हिमरू शाल, प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आल्याने रोटरी क्लबच्यावतीने प्रशासनाचे आभार मानण्यात आले.

# जालना येथे स्वयंरोजगार विकास मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन .

**जालना -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना एक दिवसीय मोफत स्वयंरोजगार विकास मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसित करुन उद्योगाच्या अनेक संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटना कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, विमा संरक्षण, शासकीय परवाने, जागेची निवड करणे इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे, मो.९४२३७३०९३२ दांडगे मिटकॉन यांच्याशी संपर्क साधावा.





पवित्र रमजान महिना सुरू असून ईद साठी काही दिवस शिल्लक असून शहरातील बाजारात कापड खरेदीसाठी महिलांची गर्दी होत आहे (छायाचित्र तांबोली )

# कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना मातृत्व लाभापासून वंचित ठेवणे हे त्यांच्या मातृत्वाच्या प्रतिष्ठेशी तडजोड करण्यासारखे: मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना -** नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण निकालाचे स्वागत केले आहे, ज्यामध्ये न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, अधिकाधिक महिला आर्थिक स्वातंत्र्यासाठी कार्यक्षेत्रात उतरत असताना, त्यांना मातृत्व रजेचे फायदे नाकारून त्यांच्या मुलाची काळजी घेण्याच्या भूमिकेशी तडजोड केली जाऊ शकत नाही. न्यायमूर्ती रियाझ छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला (बीएमसी) पालिकेच्या केईएम रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरला तात्काळ मातृत्व लाभाचे फायदे देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने अधोरेखित केले की, मातृत्वाची प्रतिष्ठा जपण्यासाठी मातृत्व लाभ कायदा, १९६१ लागू करण्यात आला होता. या निकालामुळे कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या लाखो महिलांना मोठा दिलासा मिळाला असून, समान न्यायाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे ॲड. धनावत यांनी म्हटले आहे.

सदर प्रकरण डॉ. धनश्री कारखानीस यांच्या याचिकेशी संबंधित आहे, ज्या मुंबईतील पालिकेच्या केईएम रुग्णालयात भूलतज्ज्ञ विभागात ४ जानेवारी २०२२ पासून कंत्राटी तत्त्वावर सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. १२ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांनी बीएमसीसोबत एक करार केला, ज्यामध्ये त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती नमूद केल्या होत्या. या करारानुसार, त्यांना पालिकेच्या स्थायी कर्मचाऱ्यांप्रमाणे सुट्ट्या किंवा रजेचे फायदे मिळणार नव्हते. तथापि, २० ऑगस्ट २०२४ रोजी त्यांनी रुग्णालयाच्या डीनकडे मातृत्व लाभ कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार सहा महिन्यांच्या प्रसूती रजेसाठी अर्ज केला. मात्र, २१ ऑक्टोबर २०२४ रोजी रुग्णालय प्रशासनाने त्या कंत्राटी कर्मचारी असल्याचे कारण देत त्यांचे मातृत्व लाभाचे अर्ज फेटाळले होते, ज्याला त्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले.

न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, मातृत्व लाभाचा मुख्य उद्देश मातृत्वाच्या प्रतिष्ठेचे रक्षण करणे आणि स्त्रीला व तिच्या मुलाला आर्थिक सुरक्षा प्रदान करणे हा आहे, जेणेकरून ती कामावर नसतानाही तिची काळजी घेतली जाईल. आजच्या युगात अधिकाधिक महिला आत्मनिर्भरता आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी नोकरी करत आहेत. अशा परिस्थितीत, त्यांना त्यांच्या मुलाची काळजी घेण्याच्या भूमिकेशी तडजोड करावी लागणार नाही, हे सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. न्यायालयाने बीएमसीच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सुरुवातीला, जून २०२५ मध्ये झालेल्या सुनावणीदरम्यान, पालिकेने कायद्यांतर्गत लाभ देण्यास सहमती दर्शविली होती, परंतु नंतर या वर्षी त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. न्यायालयाच्या मते, बीएमसीची ही भूमिका पूर्णपणे अविचारी आणि कायद्याच्या मूळ उद्देशाच्या विरोधात होती.

न्यायालयाने स्पष्ट केले की, बीएमसीने घेतलेली भूमिका आणि त्यांचे वर्तन भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत याचिकाकर्त्याच्या मूलभूत अधिकारांमध्ये हस्तक्षेप करणारे आहे. याचिकाकर्त्या कंत्राटी कर्मचारी आहेत आणि हे धोरणात्मक प्रकरण आहे, या कारणास्तव मातृत्व लाभ नाकारण्याच्या निर्णयाला कोणताही कायदेशीर आधार नाही. धोरणात्मक निर्णयदेखील भेदभावरहित आणि मनमानीपणापासून मुक्त असले पाहिजेत, जेणेकरून ते भारतीय संविधानाच्या कलम १४ च्या कसोटीवर टिकतील. बीएमसीने सुरुवातीला तत्त्वतः लाभ देण्याचे मान्य करून नंतर नकार देण्याच्या भूमिकेचे कोणतेही तर्कसंगत समर्थन होऊ शकत नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने कायद्याच्या उद्दिष्टावर भर देताना सांगितले की, राज्याने याचिकाकर्त्यासारख्या पात्र व्यक्तींप्रति अधिक संवेदनशील असणे अपेक्षित आहे. ज्या प्रकरणांमध्ये प्रतिवादींनी (बीएमसी) तत्त्वतः मातृत्व लाभाची रक्कम देण्याचे मान्य केले होते, अशा प्रकरणांमध्ये याचिकाकर्त्याला न्यायालयाकडून आदेश मिळवण्यास भाग पाडले जाऊ नये. भविष्यात प्रतिवादी अशा प्रकारची अवास्तव भूमिका घेणार नाहीत, अशी अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली. या निरीक्षणांसह, खंडपीठाने याचिका निकाली काढली आणि बीएमसीला डॉ. कारखानीस यांना सर्व मातृत्व लाभ तात्काळ देण्याचे निर्देश दिले. ॲड. धनावत यांनी या निकालाचे कौतुक करताना म्हटले की, हा निकाल केवळ एका डॉक्टरचा विजय नसून, तो देशातील प्रत्येक कंत्राटी महिला कर्मचाऱ्याच्या हक्काचा आणि सन्मानाचा विजय आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.